नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२ ऑक्टोंबर २०२४ (बुधवार)**

---

## पो.स्टे.पारशिवनी हद्दीतील ग्रामीण रुग्णालय जवळून मोटर सायकल चोरी करणारे दोन आरोपी तसेच पो.स्टे.कळमेश्वर हद्दीतून अक्टीव्हा मोपेड चोरी करणारे दोन इतर आरोपींना पारशिवनी पोलिसांनी पकडले...

दिनांक. ३०/०९/२०२४ रोजी पारशिवनी येथे आठवडी बाजार असल्याने फिर्यादी नामे संजय परसराम दुनेदार वय ३६ वर्ष रा.बाबुळवाडा ता.पारशिवनी यांनी त्यांची Discover-150 मोटर सायकल क्र.MH-40-AL-5326 किं.अंदाजे ३५,०००/— रु ही ग्रामीण रुग्णालय पारशिवनी जवळ ठेवून बाजार करायला गेले व काही वेळाने बाजार करून परत आले असता त्यांना त्यांनी ठेवलेल्या ठिकाणी त्यांची Discover-150 मोटर सायकल दिसून आली नाही. परिसरातील लोकांकडून माहिती घेतल्यावर दोन अनोळखी इसमांनी सदर मोटर सायकल ढकलत चोरून नेली आहे, अशी माहिती मिळाली. यावरून फिर्यादी यांनी पो.स्टे.ला दिलेल्या रिपोर्ट वरून अप.क्र.३५८/२४ कलम ३०३(२) BNS अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याचे तपासात पो.स्टे.पारशिवनी येथील डी.बी.पथकातील अधिकारी व कर्मचारी हे सदर आरोपींचा शोध घेत असता फिर्यादीने रिपोर्ट मध्ये नमूद केले प्रमाणे दोन इसम नामे **१) अमोल शुद्धोधन भिवगडे वय ३३ वर्ष रा.कांजी हाऊस जवळ पारशिवनी व २) निखील मधुकर रायपुरकर वय ३१ वर्ष रा.बारई मोहल्ला पारशिवनी** यांना ताब्यात घेऊन विचारपूस केल्यावर त्यांनी सदर मोटर सायकल चोरी केल्याचे कबूल केले व सदर दोन्ही आरोपितांकडुन चोरी गेलेली Discover-150 मोटर सायकल क्र.MH-40-AL-5326 किं.अंदाजे ३५,०००/— रु ही हस्तगत करण्यात आली.

त्याच प्रमाणे पो.स्टे.पारशिवनी येथील डी.बी.पथकातील अधिकारी व कर्मचारी हे दिनांक.०१/१०/२४ चे रात्री दरम्यान गस्त करीत असता दोन इसम नामे **१) अंचल संतकुमार सराठे वय २० वर्ष रा. सटवा माता मंदिर जवळ सावनेर व २) गौरव दिपक रुशिया वय २० वर्ष रा.वार्ड नं. १७, पहलेपार सावनेर** हे अक्टीव्हा मोपेड क्र. MH-40-AG-3803 किं.अंदाजे ३०,०००/— रु ही संशयित रीत्या चालवितांना मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस केल्यावर त्यांनी सदरची अक्टीव्हा मोपेड क्र.MH-40-AG-3803 ही दिनांक.०१/१०/२०२४ चे रात्रीचे ०१:०० वा. चे सुमारास कळमेश्वर येथून चोरी केल्याचे कबूल केले. यावरून दोन्ही इसम व अक्टीव्हा मोपेड क्र.MH-40-AG-3803 ही ताब्यात घेण्यात आली. सदर प्रेरणी पो.स्टे.कळमेश्वर येथे अप.क्रं. /२०२४ कलम ३०३(२) ठछै अन्वये गुन्हा नोंद असुन सदर दोन्ही इसम व अक्टीव्हा मोपेड क्र. MH-40-AG-3803 ही पुढील कार्यवाहीस पो. स्टे.कळमेश्वर चे ताब्यात देण्यात आली.

सदर दोन्ही कार्यवाही ही मा.पोलीस अधीक्षक साहेब, नागपुर ग्रामीण श्री.हर्ष ए पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक साहेब, श्री.रमेश धुमाळ, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, श्री. रमेश बरकते, यांचे मार्गदर्शनाखाली पो.स्टे.पारशिवनी चे ठाणेदार राजेशकुमार थोरात, पोउपनि/शिवाजी

भताने, पोउपनि/संघमित्रा बांबोडे, स.फौ/देवानंद उकेबोंद्रे, स.फौ/रामराव पवार, पोहवा/मुदस्सर जमाल, पोअं/विरेंद्रसिंग चौधरी, राकेश बंधाटे, पृथ्वीराज चौव्हान, भुषन भोंडे, सुर्यप्रकाश वावरे व चालक संदीप

बळेकर यांचे पथकाने पार पाडली.

## पोस्टे नरखेड मर्ग क्र ४६/२०२४

पोस्टे नरखेड मर्ग क्र ४६/२०२४ भारतीय नागरीक सुरक्षा संहीता मधील १९४ फिर्यादी श्री नरेंद्र प्रेमलाल सेठीया वय ५३ वर्ष रा. मोवाड तह नरखेड यांचे तक्रारीवरून दिनांक ०२/१०/२०२४ रोजी दाखल आहे. सदर मर्गमधील मयत श्री विजय मधुकर पचोरी वय ६८ वर्ष सेवानिवृत्त शिक्षक असुन ते मयत पत्नी सौ माला विजय पचोरी वय ५३ वर्ष, मुले श्री गणेश विजय पचोरी वय ३८ वर्ष, श्री दिपक विजय पचोरी वय ३६ वर्ष रा सर्व रा मोवाड यांचेसह श्री ओमप्रकाश जानराव खोब्रागडे रा मोवाड यांचेकडे सन २०१८ पासुन भाड्याने राहत होते.

नमुद चारही मयतांनी ते राहत असलेल्या भाड्याचे घरातील छताचे हुकाला दोरी बांधुन गळफास घेवुन आत्महत्या केलेली आहे. मयत श्री गणेश विजय पचोरी यांचे खिश्यातुन सुसाईड नोट्स मिळालेली असुन त्यावर चारही मयतांच्या सह्या आहे. सदर सुसाईड नोट्स मध्ये मयत गणेश पचोरी यांचेविरूध्द पांढुर्णा येथील दाखल अपराधाचा उल्लेख आहे. मयत श्री गणेश विजय पचोरी रा मोवाड हे मातृसेवा निधी लिमीटेड, पांढुर्णाचे संचालक होते. त्यांचेविरूध्द यापुर्वी पोलीस स्टेशन पांढुर्णा येथे अपराध क्र १०४/२४ कलम ४२०,१२० (ब) प्रमाणे गुन्हा दिनांक १४.०२.२०२४ रोजी दाखल असुन त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आलेली होती. सदर दाखल असलेल्या अपराधामुळे आत्महत्या केलेली आहे.

सदर मर्गचे घटनास्थळी प्रादेशिक न्यास सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा नागपुर येथील पथकांनी भेट दिलेली आहे. सदर चारही मयतांचे प्रेत उत्तरीय तपासणीकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे पाठविण्यात आले आहे. सदर मर्गचे तपास प्रकरणी पोलीस प्रत्येक पैलुचा बारकाईचे तपास करीत आहे. सदर मर्गचा तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री अजित कदम पोलीस स्टेशन नरखेड हे करीत आहे.

## प्राणांतिक अपघात

**पो.स्टे. केळवद** :— मौजा रामपूरी फाटा केळवद येथे दिनांक ३०/०९/२४ रात्री १०/३० वा. दरम्यान. **१)मंगल परसराम ब्रम्हणे वय ४७ वर्ष रा. भिमफाटा त. बरघाट जि. शिवनी (म.प्र) ह.मु. बैलवाडा कोराडी जि. नागपूर हे त्यांच्या ताब्यातील सायकल क्र एम एच ३१ बी एन ९६७७ बॉक्सर गाडी घेऊन जखमी नामे— प्रविन मरसकोल्हे याचे गावाला मध्यप्रदेश येथे जात असता सावनेर छिंदवाडा हायवे रोड रामपूरी फाटा येथे कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने आपले वाहण भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून त्यांच्या मोटर सायकल ला ठोस मारली** .त्यामुळे मृतक यांच्या डोक्याला मार लागल्याने तसेच जखमी नामे प्रविन मरसकोल्हे यांना डाव्या पायाला गंभीर मार लागला त्यामुळे त्या दोघांना उपचाराकामी ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे नेले असता डॉक्टरांनी १)मंगल परसराम ब्रम्हणे वय ४७ वर्ष यांना तपासुन मृत घोषीत केले. जखमी नामे— **प्रविन मरसकोल्हे यांचा** उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— राजेश मंगलजी ब्रम्हणे वय २७ वर्ष रा. भिमफाटा त. बरघाट जि. शिवनी (म.प्र) ह.मु. बैलवाडा कोराडी जि. नागपूर यांच्या रिपोर्ट वरून पोस्टे केळवद येथे **अज्ञात वाहन चालका विरूध्द** कलम २८१,१२५ (ठ), १०६ (१) बी एन एस सहकलम १८४, १३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास सपोनि अनिल राऊत पो स्टे केळवद ठाणेदार मो. नं. ८६६८३८५५७६ हे करीत आहे.

## अवैध जनावरांची वाहतुक करणा—या आरोपीतांवर गुन्हा नोंद
## नागपुर ग्रामीण मौदा पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ३०/०९/२४ ते ०१/१०/२४ वेळ २२/१८ ते ०२/५५ वा दरम्यान रोजी मौदा पोलीस पेट्रोलींग करत असातांना पोलीसांना गुप्त बातमीदारा कडुन माहीती मिळाली की **भंडारा कडुन नागपूर कडे काही गाड्यांमध्ये अवैधरित्या जनावरे भरून कत्तलीकरिता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या** माहीतीच्या आधारे पोलीसांनी नाकाबंदी केली असता भंडारा ते नागपूर रोड, मौजा वडोदा शिवार, झुल्लर फाटा, कामठी येथे **ट्रक क्र एम.एच. ४० बी.जे. ५४९८ मिळुन आल्याने वहनास थांबवुन वाहन आरोपी चालक नामे—** मुसा अमान नसीम अक्तर वय २३ वर्षे रा. वारीसपुरा, कामठी, जि नागपुर याला **विचारपुस करून वाहनांची पंचासमक्ष पाहणी केली असता वाहनाच्या डाल्यामध्ये २५ गोवंश जनावरे क्रुरतेने शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयतेने चारा पाण्याची व्यवस्था न करता कत्तलीकरिता वाहतुक करतांना मिळुन आल्याने** घटनास्थळावरून पंचासमक्ष **ट्रक क्र एम.एच. ४० बी.जे. ५४९८ किंमत १०,००,०००/— आणि २५ गोवंश जनावरे किंमत २५०,०००/— रूपये प्रमाणे एकुण किमती १२,५०,०००/— रूपयें असा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.**

तसेच दिनांक ०१/१०/२४ चे २२/१८ ते ०४/०० वा. गुमथळा शिवार, हल्दीराम कंपनी गेट क्र ४ समोर, कामठी येथे सुध्दा **पिकप वाहन क्र एम.एच.३६ एए ३२४१ मिळुन आले सदर वाहनास थांबण्यास इशारा केला असता आरोपी चालक नामे — १**.तुलसीराम नागरीकर वय २५ वर्षे रा. संजय नगर,लाखोरी रोड,लाखनी जि भंडारा हा वाहन कडेला लावुन अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला त्याच्या सोबत असलेला आरोपी नामे —२. रोहीत रमेश गभणे बाजार वार्ड,लाखणी, याला **विचारपुस करून वाहनांची पंचासमक्ष पाहणी केली असता वाहनाच्या डाल्यामध्ये १२ गोवंश जनावरे क्रुरतेने शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयतेने चारा पाण्याची व्यवस्था न करता कत्तलीकरिता वाहतुक करतांना मिळुन आल्याने** घटनास्थळावरून पंचासमक्ष **ट्रक क्र पिकप वाहन क्र एम.एच.३६ एए ३२४१ किंमत ५,००,०००/— आणि १२ गोवंश जनावरे किंमत १२०,०००/— रूपये असा एकुण मुददेमाल ६,२०,००० रूपयें असा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपी **विरूध्द पोस्टे मौदा येथे** प्राण्यांना निर्दयतेने वागविण्याचा कायदा **अन्वये** दोन गुन्हे नोंद करण्यात आलेला आहे. तसेच पुढील तपास मौदा पोलीस करत आहेत.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस स्टेशन मौदा चे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री प्रमोद घोंगे, पोलीस हवालदार राजेंद्र गौतम, पोलीस अंमलदार अतुल निंबार्ते, शुभम ईश्वरकर, प्रणय बनाफर स्टॉप यांनी पार पाडली.


MH 40 BL 5498



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणा—या आरोपीविरूध्द कारवाई
## ०६ ब्रास रेती सह एकुण ३५,३०,०००/— रूपयाचा मुददेमाल

पोलीस स्टेशन मौदा :— अंतर्गत **दि. ३०/०९/२४ रोजी २२/३५ वा. सुमारास गोपनीय सुत्रधाराकडुन माहिती मिळाली की, भंडारा कडुन एक १६ चक्का ट्रक एम.एच २७ बीएक्स ७७६२ वाहनामंध्ये अवैध्यरित्या विनापरवाना रेती लोड करून नागपूरकडे वाहतुक करित आहे. मिळालेल्या माहिती नुसार २२/५० वा सुमारास पोलीसांनी माथनी टोल नाका येथे ट्रक एम.एच २७ बीएक्स ७७६२ थांबवूण वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती किंमती अंदाजे ३०,०००.०० रू मिळुन आली असुन सदर वाहन चालकांस रेतीबाबतचा परवाना विचारणा केली असता परवाना नसल्याचे सांगितले. आरोपी वाहन चालक नामे** शिवाजी दत्तात्रय दराडे वय ३८ वर्षे रा. भराडखेडा ता. बदनापूर जि.जालना पोस्टे बदनापूर याच्या ताब्यातुन **एक पांढरा व केसरी रंगाचा टाटा कंपनीचा १६ चक्का ट्रक एम.एच २७ बीएक्स ७७६२ मुल्य ३५,००,००० /—रू व अंदाजे ०६ ब्रास रेती मुल्य ३०,०००/—रू असा एकुण ३५,३०,०००/— रूपयाचा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे.**

**फिर्यादी** अतुल यादोराव निबांर्ते वय ३० वर्षे पोस्टे. मौदा यांच्या रिपोर्ट वरून दोन्ही आरोपी शिवाजी दत्तात्रय दराडे वय ३८ वर्षे रा. भराडखेडा ता. बदनापूर जि.जालना पोस्टे बदनापूर याच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२) ४९ भा. न्या.सं ४८, सहकलम ४८(७), ४८(८) महा.जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस स्टेशन मौदा चे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री प्रमोद घोंगे, पोलीस हवालदार राजेंद्र गौतम, पोलीस अंमलदार अतुल निंबार्ते, शुभम ईश्वरकर, प्रणय बनाफर स्टॉप यांनी पार पाडली.

## लाकुड चोरी तसेच अवैध दारू चोरून वाहुन नेणा—या इसमांवर कारवाई
## वाहनासह एकुण किमती ६,५३,०५०/—रू चा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन खापा :— दिनांक ०२/१०/२४ रोजी पोलीस स्टेशन खापा चे स्टॉफ हे सरकारी वाहनाने लाकुड चोरी व दारूची अवैध वाहतुकी संबधाने मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलिंग करीत असता बडेगाव ते खापा रोडने एक मालवाहु वाहन अतिवेगाने समोर जातांना दिसले, सदर वाहन संशयास्पद दिसल्याने त्या वाहनास ओव्हरटेक करून थांबविण्याचा प्रयत्न केला असता सदर वाहन चालक यांनी त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन खापा रोडने जात असता, सदरचे वाहनाचा पाठलाग केला असता वाहन चालक व त्याचा साथीदार हे खापा रोडवरील बावनगाव बसस्टॉफ येथे टाकुन वाहन सोडुन पसार झाले.

सदर वाहनाची बारकाईने तपासणी केली असता वाहन क्र एम एच ४० सीडी ८५५८ या वाहनाचे मागच्या डाल्यात जंगलातीन कोणत्यातरी मौल्यवान प्रजातीचे झाडांचा गोलाकार कापलेला लाकुड फाटा भरलेला दिसला. तसेच एक प्लास्टीक डबकीत अंदाजे ७ लीटर व दोन प्लास्टीक बॉटलमध्ये ४ लीटर गावठी मोहाफुल दारू असल्याचे दिसले. तसेच वाहनाचे कॅबीनमध्ये एका प्लास्टीक थैलीत लाला मिर्ची पावडर दिसुन आले. सदर लाकुडची मोजणी केली असता किमती ५०,०००/रू ची लाकडे व ११ लीटर मोहाफुल गावठी

दारू किमती ५५०/—रू ची एक मोठी ताडपत्री किमती २५००/— रू व एक मालवाहु वाहन क्र एम एच ४० सीडी ८५५८ किमती ६,००,०००/—रू असा **एकुण किमती ६,५३,०५०/—रू चा मुद्देमाल** मिळुन आल्याने नमुद आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन खापा येथे ३०३(२),३(५),भारतीय न्याय संहीता सहकलम ६५ (अ)ई,८३ मदाका अन्वयें गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. श्री अनिल म्हस्के उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग तथा सहा पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी , पोलीस उपनिरीक्षक श्री सचिन जंगम व पोलीस अंमलदार बटाउवाले यांनी पार पाडली.

**सदर बातमीचा फोटो सोबत जोडलेला आहे.**




पोलीस माहीती कक्ष

नागपुर ग्रामीण जि नागपुर